# वसुंधरा महाविद्यालयात सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन

## दीडशे विद्यार्थ्यांनी घेतला कार्यक्रमाचा लाभ

शहर संचार



▶ **सोलापूर, दि. २६-** येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमाचा दीडशे विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

या उपक्रमामध्ये संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी, आजच्या ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दलची उदाहरणाद्वारे माहिती दिली. फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबरवरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करून घ्यावी, व्हॉट्सअॅप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्राँग वापरून आपली माहिती सुरक्षित करावी, तसेच आपली माहिती ही आपली जबाबदारी आहे.

त्यासाठी मोबाइल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय आढाव्यात महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनुराधा क्षीरसागर, प्रा. मुल्ला ए.ए., प्रा. आसमा शेख, प्रा. मेघा ढाणके यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन योगेश शिंदे या विद्यार्थ्याने केले तर आभार सायली उबाळे यांनी मानले.